PUNEMETROPOLIS
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत,आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४११०४४,
दूरध्वनी क्र.020-27659855 Email : ad.pmrda@gmail.com

प्रशा/पुमप्रविप्रा/कार्यालयीन परिपत्रक व आदेश/ ५५४ दिनांक :- २९।०५।२०२५

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय** :- शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना भेटीसाठी येणाऱ्या अभ्यागतांना भेट देणे, उपस्थित राहणे, स्थळ पाहणी व जेवणाची वेळ याबाबतचे परिपत्रक...

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९/ १८(र. व का.) दि. २/२/२०१६.

२) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. प्रशा/कार्यालयीन परिपत्रक व आदेश/४३६ दि. ०१/०४/२०२५.

३) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. प्रशा/कार्यालयीन परिपत्रक व आदेश/५०१ दि. १८/०४/२०२५.

संदर्भांकित शासनाकडील परिपत्रकान्वये शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना भेटीसाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी नोंदवही ठेवणे, भेटीची वेळ दर्शविणारा फलक लावणे इत्यादीबाबत मार्गदर्शक सुचना जाहीर करणेत आल्या असून, त्याचे काटेकोर पालन करणेकामी निर्देश देणेत आले आहेत.

१. सोमवार व गुरुवार – कार्यालयात अभ्यांगतांच्या भेटीसाठी विभागप्रमुखांनी पूर्णवेळ उपस्थित राहणे.
२. सोमवार ते शुक्रवार – कार्यालयात अभ्यांगतांच्या भेटीसाठी विभागप्रमुखांच्या अधिनस्त अधिकारी यांनी दुपारी ३ ते ६ उपस्थित राहणे.
३. बुधवार व शुक्रवार – स्थळ पाहणी, क्षेत्रिय कार्यालयास भेटी देणे.
४. जेवणाची वेळ – दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत.

त्या अनुषंगाने सर्व विभाग प्रमुख यांना सूचित करणेत येते की, आपल्याकडे कार्यालयात भेटीसाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी सोमवार व गुरुवार कार्यालयात पूर्णवेळ उपस्थित रहावे. सदर नेमून दिलेल्या वेळेमध्ये आपण सभा किंवा इतर महत्वाचे कामकाजानिमित्त कार्यालयात उपस्थित नसल्यास अन्य अधिकारी यांची तात्पुरती नियुक्ती करावी.

तरी सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांच्या निर्देशनास सदर परिपत्रक आणून द्यावे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ चे निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक रद्द समजण्यात यावे.

(मा. महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने)

(पूनम मेहता)
सह आयुक्त, प्रशासन
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

Scanned with OKEN Scanner